# चाळिशीपार मूत्रपिंड कर्करोगाचा धोका

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** वयाची चाळिशी हा एक परिवर्तनाचा काळ आहे. या वयात काम, कुटुंब आणि वैयक्तिक आरोग्य यांचा समतोल साधणे महत्त्वाचे असते. बरेच लोक निरोगी हृदय राखण्यावर किंवा वजन नियंत्रित करण्यावर लक्ष केंद्रित करतात, परंतु मूत्रपिंडाच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. मूत्रपिंडाचा कर्करोग, किंवा मूत्रपिंडाच्या पेशींचा कर्करोग, प्रामुख्याने असामान्य पेशींच्या वाढीमुळे उद्भवतो, ज्यामुळे ट्यूमरही तयार होतो. वयाच्या ४०व्या वर्षी आजार ओळखल्यास लक्षणीय फरक पडू शकतो.

तज्ज्ञांच्या मते, मूत्रपिंडाच्या कर्करोगाची प्रारंभीच्या टप्प्यात अनेकदा लक्षणे दिसून येत नाही तथापि, तो जसजसा वाढत जातो तसतशी लक्षणे जाणवू लागतात. यात प्रामुख्याने लघवीमध्ये रक्त, सततची पाठदुखी, कारणाशिवाय वजन कमी होणे, थकवा, सूज किंवा फुगीरपणा, ताप किंवा रात्री घाम येणे यांचा समावेश आहे. यावर उपाय म्हणजे जीवनशैलीत बदल करणे असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. यात प्रामुख्याने लठ्ठपणा कमी करणे, धूम्रपान टाळणे, मद्यपान मर्यादित करणे, हायड्रेटेड राहणे म्हणजे भरपूर पाणीसेवन याद्वारे मूत्रपिंडाचे कार्य सुरळीत सुरू राहते. यासोबतच अनियंत्रित रक्तदाबाचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. कारण अनियंत्रित उच्च रक्तदाबामुळे मूत्रपिंडावर दबाव वाढतो व कर्करोगाचा धोका वाढतो. त्यामुळेच लक्षणे जाणवत असल्यास आरोग्यसेवकांचा सल्ला व उपचार आवश्यक आहेत. प्रारंभीच्या टप्प्यातील मूत्रपिंडाच्या कर्करोगासाठी उपचारांचे परिणाम चांगले असतातच आणि नियमित तपासणी व निदान करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावतात.

ठेवींवर आकर्षक व्याजदर
सर्वसाधारण/ संस्था ठेवीदार 7.60%*
ज्येष्ठ नागरिक 8.00%*
(ROI p.a.) *अटी लागू
मुदत : १३ महिने
कॉसमॉस को-ऑप. बँक लि. (मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक) जीवन करा समृद्ध!
Toll Free No.: 1800 233 0234

# गजा मारणेच्या साथीदारास सांगलीतून अटक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** गुंड गजा मारणेच्या साथीदारास गुन्हे शाखेने सांगलीतून अटक केली. मारणेला येरवडा कारागृहातून सांगलीतील कारागृहात हलविण्यात येत असताना वाटेत एका ढाब्यावर मारणेने मटण पार्टी केल्याचे उघडकीस आले होते. त्या वेळी मारणेला पैसे आणि कपडे पुरविण्यात आले होते. याप्रकरणात मारणेच्या सांगलीतील साथीदाराला पोलिसांनी अटक केली.

बाळकृष्ण उर्फ पांड्या लक्ष्मण मोहिते (वय ४०, रा. सीतारामनगर, सांगली) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. कोथरूडमध्ये दुचाकीस्वाराला मारहाण केल्याच्या प्रकरणात मारणे आणि साथीदार येरवडा कारागृहात आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव मारणेला सांगली येथील कारागृहात नेण्यात येत होते. त्या वेळी पोलीस बंदोबस्तावर सहायक पोलीस निरीक्षकासह चार पोलीस कर्मचारी होते. वाटेत एका ढाब्यावर मारणेची व्हॅन थांबविण्यात आली. बंदोबस्तात असलेल्या सहायक पोलीस निरीक्षकासह पाच पोलीस कर्मचाऱ्यांनी त्याच्याबरोबर ढाब्यावर जेवण केले. मारणेच्या व्हॅनबरोबर असलेल्या मोटारीतील साथीदारांनी मारणेला बिर्याणी नेऊन दिली. मारणेला तेथे सतीश शिळीमकर, विशाल धुमाळ, बाळकृष्ण ऊर्फ पांड्या मोहिते हे भेटले. तपासात ही बाब उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी मकोका कायद्यान्वये शिळीमकर, धुमाळ आणि मोहिते यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

मोहितेला पकडण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली. अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या युनिट दोनचे पोलीस निरीक्षक प्रताप मानकर, सहायक निरीक्षक आशिष कवठेकर, उज्ज्वल मोकाशी, कुंभार आणि पथकाने ही कारवाई केली. मोहितेला अटक करून बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले. सरकारी वकील प्रमोद बोंबटकर यांनी तपासासाठी पोलीस कोठडी देण्याची विनंती केली. विशेष मकोका न्यायालयाने मोहिते याला पाच दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

डॉ. रुचा Tanvi Herbals CLINIC
डॉ. रुचाज् तन्वी हर्बल्स क्लिनिक
FREE नाडीपरीक्षण चेकअप
शनि. 17 मे
लिपोमा, ॲसिडिटी, अपचन, पीसीओडी, मधुमेह, हेअर प्रॉब्लेम्स, हाय बीपी, संधिवात, किडनी स्टोन, थायरॉइड, क्रोनिक एलर्जी, स्किन इन्फेक्शन्स इ. वर
ठाणे स. 11 ते सायं. 4 वाजेपर्यंत
दादर सायं. 6 ते रात्री 8 वाजेपर्यंत
तन्वी संचालिका यांना भेटा. डॉ. रुचा मेहेंदळे - पै
अपॉइंटमेंट आवश्यक 9082911530
DR. RUCHA'S Tanvi NavTej PANCHAKARMA
डॉ. रुचाज् तन्वी नवतेज पंचकर्म



शिरोधारा
ठाणे 9082911530

Since 1983
MIT-WPU
Dr. Vishwanath Karad MIT WORLD PEACE UNIVERSITY | PUNE
TECHNOLOGY, RESEARCH, SOCIAL INNOVATION & PARTNERSHIPS
A University For Life Transformation



Start Your UG Journey at MIT-WPU, Pune
Admissions Open for A.Y. 2025-26
Choose your UG Programme from the Following Disciplines
Computer Science & Technology | Engineering | Design & Visual Arts | Psychology
Management Studies | Economics & Commerce | Education | Liberal Arts
Pharmacy | Health Science & Technology | Clinical Sciences | Film Studies | Law
Media & Communication | Pure Sciences & Environmental Studies | Biotechnology
Politics & Governance | & More
100+ Student Clubs | 2000+ Industry Connects | 100,000+ Global Alumni Network
LEARNING BEYOND CLASSROOM
Rural, National, and International Immersion Programmes, Peace Studies, Social Leadership Development Programme and Bharatiya Chhatra Sansad
Merit Based Scholarships Available For Meritorious Students.
SCAN TO APPLY
MIT-WPU, Pune | +91 020-71177137 | +91 98814-92848
admissions@mitwpu.edu.in | mitwpu.edu.in

# टँकरसाठी जादा दर आकारू नका

## महापालिका आयुक्तांची टँकरचालकांना तंबी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'टँकरने पाणी देताना नागरिकांकडून जादा शुल्क आकारू नका,' अशी तंबी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी टँकरचालकांना बुधवारी दिली. टँकरचालकांनी जादा पैशांची मागणी केल्यास महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे तक्रार करा, असे आवाहन आयुक्तांनी केले.

गेल्या काही दिवसांपासून शहरात पाण्याच्या टँकरची मागणी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांनी बुधवारी महापालिकेत टँकर चालक-मालक असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत नागरिकांना वेठीस धरून टँकरसाठी वाढीव दर आकारू नये, अशा सूचना आयुक्तांनी केल्या.

या बैठकीत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून टँकर भरून घेऊन नागरिकांना पोहोचविण्यासाठी निश्चित किती खर्च येतो, याची माहिती घेण्यात आली. टँकर भरण्याचे ठिकाण आणि ज्या ठिकाणांवरून टँकरची मागणी झाली आहे, त्यामधील अंतर यावर टँकरचे दर घेतले जातात. नागरिकांची पाण्याची गरज लक्षात घेता विनाकारण दर आकारू नका, अशा सूचना देण्यात आल्याचे आयुक्त डॉ. भोसले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

ज्या भागात महापालिकेला पाणी देता येत नाही तेथे महापालिकेच्या वतीने टँकरद्वारे मोफत पाणी दिले जाते. आंबेगाव बुद्रुक, नऱ्हे, खराडी या भागांतून टँकरसाठी पैसे मागितले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. याची दखल घेऊन संबंधितांवर कडक कारवाई करण्याचा इशाराही महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांनी दिला. मात्र, टँकरचालक नागरिकांकडे पैसे मागत असल्याच्या काही तक्रारी समोर आल्या आहेत. जे टँकरचालक नागरिकांकडून पैसे मागतील त्यांची तक्रार पाणीपुरवठा विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे करावी. शहरातील टँकरची मागणी आणि त्यासाठी घेतले जाणारे शुल्क याचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### 'विहीर तसेच बोअरवेलमधून स्वच्छ पाणी द्या'

महापालिकेच्या टँकर भरणा केंद्राबरोबरच बोअरवेल तसेच विहिरीमधून पाणी भरून ते टँकरद्वारे पोहोचवले जाते. हे पाणी देताना ते शुद्ध असेल, याची खात्री संबंधित टँकरचालकांनी आणि मालकांनी करून त्यानंतरच त्याचे वितरण नागरिकांना करावे, अशी सूचना महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी केली. पाणीपुरवठा करताना त्यामध्ये आवश्यक प्रमाणात क्लोरिन टाकण्याच्या सूचनाही भोसले यांनी दिल्या.

# कामावर निघालेल्या महिलेवर बलात्कार

(पान १ वरून)

महिला रात्रपाळीत कामासाठी कंपनीत निघाली होती. या वेळी आरोपीने तिचा पाठलाग करून खंडोबा मंदिराजवळ तिचा रस्ता अडवला. त्यानंतर जबरदस्तीने तिला ओढून निर्जनस्थळी नेले आणि तिच्यावर अत्याचार केले.

महिलेने आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केला. आरोपीचा चावाही घेतला. आरोपीने पळ काढल्यानंतर महिलेने एक कामगार महिला आणि पुरुष यांच्या मदतीने पोलीस नियंत्रण कक्षाला दूरध्वनी करून घटनेची माहिती दिली. महिलेला तातडीने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, गुन्हे शाखेची पथके आणि स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. श्वानपथक आणि फॉरेन्सिक पथकांची मदत घेण्यात आली.

पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरणही तपासण्यात आले. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ पुढील तपास करत आहेत. 'आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, चौकशी सुरू आहे,' असे परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी सांगितले.

# ससूनमध्ये बॉम्बची अफवा पसरविणारा सुरक्षारक्षक अटकेत

**पुणे :** ससून रुग्णालयात बॉम्ब ठेवल्याचा संदेश वैद्यकीय अधिकाऱ्यांना पाठविल्याप्रकरणी सुरक्षारक्षकाला बंडगार्डन पोलिसांनी अटक केली. ज्या क्रमांकावरून संदेश पाठविण्यात आला होता. तो एका रुग्णाचा असल्याचे तपासात उघडकीस आले. सुरक्षारक्षकाने रुग्णाचा मोबाइल चोरून वैद्यकीय अधिकाऱ्यांना संदेश पाठविल्याचे तपासात उघडकीस आले.

अरविंद कृष्णा कोकणी (वय २९, रा. नागपूर चाळ, येरवडा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. १२ मे रोजी ससून रुग्णालयातील एका वैद्यकीय तज्ज्ञाच्या मोबाइल क्रमांकावर बॉम्ब ठेवण्यात आल्याचा संदेश आल्यानंतर खळबळ उडाली होती. याबाबतची माहिती मिळताच बंडगार्डन पोलीस ठाण्यातील अधिकारी, तसेच बॉम्ब शोधक नाशक पथकाने (बीडीडीएस) तातडीने घटनास्थळी धाव घेऊन तपासणी सुरू केली. 'बीडीडीएस'च्या पथकाने शोधमोहीम राबविली. ससून रुग्णालयाची तपासणी केली. तपासणीत रुग्णालयात बॉम्बसदृश वस्तू आढळून आली नाही. बॉम्बची अफवा पसरविल्याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत डॉ. हरिष सुरेश टाटिया यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

# अनिल गोगटे यांचे निधन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** प्रसिद्ध ज्योतिर्विद अनिल श्रीधर गोगटे (वय ६९) यांचे हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी शुभांगी, मुलगा अनुप आणि भगिनी व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. विद्या साठे असा परिवार आहे.



मूळचे स्थापत्य अभियांत्रिकीचे पदवीधर असलेल्या गोगटे यांनी नंतर संगणक क्षेत्रात प्रावीण्य संपादन करून नामवंत कंपन्यांना सेवा पुरवल्या. त्यांना ज्योतिषशास्त्रात रस निर्माण झाला. त्याचा अभ्यास आणि व्यासंगामुळे अल्पावधीतच त्यांना प्रसिद्धी मिळाली. राज्यभराखेरीज देशाबाहेरही असंख्य लोक त्यांचा ज्योतिषविषयक सल्ला घेत.

स्थापना 1995 लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट) प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
लोकमान्य अक्षय योजना



*10% व्याजदर प्रति वर्ष
१३ महिन्यांच्या ठेवीसह वाढवा आपली संपत्ती!
कालावधी १३ महिने | किमान गुंतवणूक १०,०००/- | ज्येष्ठ नागरिकांसाठी १०.५०% व्याजदर
स्थापना 1995 लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट) प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org

# बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961

**नोंदणीकृत कार्यालयः** आकुर्डी, पुणे -४११०३५ । **कॉर्पोरेट कार्यालयः** ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे - ४११०१४

## मुदत ठेव योजना

CRISIL AAA/स्टेबल आणि (ICRA)AAA (स्टेबल) रेटिंग

या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

**₹३ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (१६ मे २०२५ पासून लागू) वैध आहे. अनिवासी भारतीयांसाठी, OCI साठी व PIO साठी**

नियमित ठेवीदार

नियमित एफडी: ₹१५,००० ते ₹३,००,००,०००

तक्ता १

| नियमित कालावधी | संचयी: मुदत पुर्तीला (% प्र.व.) | बिगर- संचयी: मासिक (% प्र.व.) | त्रैमासिक (% प्र.व.) | सहामाही (% प्र.व.) | वार्षिक (% प्र.व.) |
|---|---|---|---|---|---|
| १२ - १४ महिने | ७.०० | ६.७९ | ६.८२ | ६.८८ | ७.०० |
| १५ - २३ महिने | ७.३५ | ७.११ | ७.१६ | ७.२२ | ७.३५ |
| १८ महिने | ७.४० | ७.१६ | ७.२० | ७.२७ | ७.४० |
| २२ महिने | ७.३० | ७.०७ | ७.११ | ७.१७ | ७.३० |
| २४ - ३६ महिने | ७.२५ | ७.०२ | ७.०६ | ७.१२ | ७.२५ |
| ३३ महिने | ७.२० | ६.९७ | ७.०१ | ७.०८ | ७.२० |

क) ठेवीचा किमान आकार हा ₹१५,०००/- राहिल.
ख) ड(२) मध्ये दिलेल्या गावांमधून आलेल्या ठेवींसाठी किमान आकार ₹५०००/- आहे. (ऑनलाईन गुंतवणुकीस पात्र नाही)
ग) केवळ एनआरओ (अ-निवासी बँक) खात्यांमधूनच ठेवीचा निधी स्वीकारार्ह असेल. ठेवीची रक्कम ही NRE / FCNR (B) खात्यातून वळती केलेली नसावी.
घ) जेष्ठ नागरिक जर प्रथम अर्जदार असेल तर (म्हणजे, वय वर्षे ६० हुन जास्त असलेल्या व्यक्ती, वयाच्या पुराव्याच्या तरतुदी अधीन): ₹३ (तीन) कोटीपर्यंतच्या प्रत्येक ठेव रकमेवर दर साल ०.५५% पर्यंतच्या दराने अतिरिक्त व्याज दिले जाईल.
ड) ₹३ कोटीहून जास्त रकमेच्या बल्क ठेवींवरील व्याजदर हा, प्रत्येक ठेवीनुसार, प्रसिद्ध केलेल्या कार्डावरील दरापेक्षा वेगळा असू शकतो आणि त्या त्या केसच्या आधारावर तो ठरवला जाईल पण असा वेगळा दर हा रिझर्व बँकेने निश्चित केलेल्या व्याजदराच्या मर्यादेतीलच असेल.
च) मुदत-पूर्तीच्या (मॅच्युरिटी) दिनांकापूर्वी ठरलेल्या विहित कालावधीत नूतनीकरणाची कोणतीही विनंती कंपनीला प्राप्त झालेली नसल्यास, कंपनीकडून मुदत-पूर्तीच्या दिनांकाला ठेव परत केली जाईल. एनईएफटी किंवा आरटीजीएस आणि / किंवा धनादेशाद्वारे (जर एनईएफटी/आरटीजीएस द्वारे हस्तांतरण नाकारले गेल्यास) ठेव अर्जात नमूद केलेल्या ठेवीदाराच्या बँक खात्यात देय दिले जाईल.
छ) ठेवीच्या (किंवा त्यातील एखाद्या हिश्शाच्या) नूतनीकरणासाठीची विनंती प्रत्यक्षतः, मुदत-पूर्तीच्या दिनांकापूर्वी २४ तास आधी करता येऊ शकेल, त्यासाठी सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांद्वारे लेखी विनंती देता येऊ शकेल, त्याप्रमाणे कंपनीला ठेव-परती किंवा ठेवीचे (किंवा त्यातील एखाद्या हिश्शाचे) नूतनीकरण ठरलेल्या देय दिनांकाला करता येईल. उपरोक्त उल्लेखित कालावधीच्या आधी ठेवीच्या नूतनीकरणाची विनंती ठेवीदाराने सादर करावयाची आहे. नूतनीकरणाच्या विनंतीसोबत सर्व ठेवीदारांनी विहित अर्जाचा नमुना यथायोग्य भरून व सह्या करून द्यावयाचा आहे. नूतनीकरण हे, ठेवीच्या नूतनीकरणाच्या दिवशी प्रचलित असणारे व्याजदर आणि इतर अटी व शर्ती यांच्या अधीन राहिल. विद्यमान ठेवीच्या मुदत-पूर्तीच्या दिवसानंतर एफडीआर हे रद्दबातल आणि अवैध ठरत असल्याने ठेवीच्या नूतनीकरणाच्या वेळी त्याची आवश्यकता असेलच असे नाही.
ज) जर ग्राहकाने अर्जाद्वारे नूतनीकरणाचा पर्याय निवडला असेल परंतु त्यानंतर त्याला नूतनीकरण करायचे नसेल तर त्यासंबंधीचा लिखित अर्ज कंपनीकडे नूतनीकरण तारखेच्या कमीत कमी २४ तास आधी पोहोचला पाहिजे. हा अर्ज सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे देता येईल. मुदत पूर्तीच्या दिवसानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दुरुस्ती झालेल्या नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज अँड मिस्लेनिअस नॉन-बँकिंग कंपनीज (जाहिरात) नियम, १९७७ नुसार द्यावयाचा तपशील.

**क. कंपनीचे नाव: बजाज फायनान्स लि.**

**ख. गठित केले गेल्याचा दिनांक: 25 मार्च, 1987**

**ग. प्रॉफिटस्/डिव्हिडंडस्:**

वरील वर्षांच्या संबंधात, जाहिरातीची तारीख आणि कंपनीद्वारे घोषित लाभांशाच्या तत्काळ आधीच्या तीन आर्थिक वर्षांसाठी, कराची तरतुद करण्याआधी व नंतर कंपनीचा नफा.

(₹ कोटींमध्ये)

| आर्थिक वर्ष रोजी संपले | नफा (स्टँडअलोन) कर-पूर्व | नफा (स्टँडअलोन) कर-पश्चात | लाभांश % |
|---|---|---|---|
| ३१.०३.२०२३ | १३,८८१.५१ | १०,२८९.७४ | १५०० |
| ३१.०३.२०२४ | १७,०५३.०८ | १२,६४४.११ | १८०० |
| ३१.०३.२०२५ | २१,६७६.०९ | १६,६६१.५० | २२०० |

**घ. कंपनीच्या व्यवस्थापनाचा थोडक्यात तपशील:**

संचालक मंडळाचे नियंत्रण व देखरेख यांच्या अधीन राहून व्यवस्थापकीय संचालक कंपनीचे व्यवस्थापन पाहतात. कंपनीचा व्यापार-उदीम आणि इतर बाबी यांच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापकीय संचालकाना आवश्यक ते अधिकार प्रदान केलेले आहेत.

**च. संचालकांची नावे, पत्ते आणि व्यवसाय:**

| नाव | पत्ता | व्यवसाय |
|---|---|---|
| श्री. संजीव बजाज (अध्यक्ष) | **पत्ता १**: प्लॉट क्र.५९, लेन क्र.३ कोरेगांव पार्क, पुणे सिटी - ४११००१. **पत्ता २**: बंगला क्र.४, बजाज विहार कॉलनी, बजाज ऑटो लि. कॉम्प्लेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे - ४११०३५. | उद्योगपती |
| श्री. राजीव जैन, (उपाध्यक्ष) | डी-२, आयव्ही ग्लेन, मॅरीगोल्ड प्रिमायसेस, कल्याणी नगर, पुणे - ४११०१४. | नोकरी |
| श्री. राजीव बजाज | ३४/३५, लेन क्र. २ कोरेगाव पार्क, पुणे, महाराष्ट्र, भारत - ४११०३५. | उद्योगपती |
| डॉ नौशाद फोर्ब्स | ७४ कोरेगाव पार्क, लेन क्र.३, पुणे - ४११ ००१. | व्यवसाय |
| श्री अनामी रॉय | ६२ सागर तरंग, खान अब्दुल गफार खान रोड, वरळी सी फेस, वरळी, मुंबई ४०० ०३०. | सेवानिवृत्त सनदी सेवक |
| श्री प्रमीत झवेरी | २१ सी, वूडलँड्स, पेड्डर रोड, कंबाला हिल, मुंबई - ४०० ०२६. | व्यवसाय |
| श्रीमती राधिका हरिभक्ती | ५१, मेकर टॉवर बी, कफ परेड, मुंबई - ४०० ००५. | आर्थिक सल्लागार / व्यावसायिक संचालक |
| डॉ. अरिंदम भट्टाचार्य | एल१/४, २रा मजला, हौस खाझ, नवी दिल्ली - ११००१६. | व्यावसायिक |
| श्री. अनुप कुमार साहा (व्यवस्थापकीय संचालक) | डी१/३०२, १३वा मजला, इऑन वॉटरफ्रन्ट, इऑन आयटी पार्कच्या रोडच्या शेजारी, खरडी, पुणे - ४११ ०१४. | नोकरी |
| श्री. तरुण बजाज | **पत्ता १**: बंगला क्र.३८, नवीन मोती बाग, नवी दिल्ली - ११० ०२१. **पत्ता २**: घर क्र.६, रस्ता क्र.४६, पंजाबी बाग, नवी दिल्ली - ११० ०२६. | स्वतंत्र सल्लागार |
| श्री. अजय कुमार चौधरी | फ्लॅट क्र.१३०४, १३वा मजला, क्रेसेंट बे टॉवर क्र.६, जेरबाई वाडीया रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२. | व्यावसायिक |

**च. सर्वात अलिकडच्या दोन लेखा-परिक्षित बॅलन्स-शीटमध्ये दिसणारा कंपनीचा (स्टँडअलोन) आर्थिक स्थिती सारांश** (₹ कोटींमध्ये)

| | ३१ मार्च २०२५ रोजी | ३१ मार्च २०२४ रोजी |
|---|---|---|
| **मालमत्ता** | | |
| **आर्थिक मालमत्ता** | | |
| रोख व रोख समकक्ष | ३,३७४.४१ | ३,८६५.१५ |
| रोख आणि रोख समकक्षांव्यतिरिक्त बँक बॅलन्स | ९,०८०.९८ | ५,५६७.११ |
| व्युत्पन्न आर्थिक साधने(डेरीवेटीव्ह फायनान्शियल इंस्ट्रुमेंट्स) | २०१.९७ | १५.६९ |
| व्यापार प्राप्ती (ट्रेड रिसिव्हेबल्स) | १,४१६.३९ | १,२४४.८९ |
| कर्जे | ३,०४,३५९.१६ | २,४३,३३४.४३ |
| गुंतवणूकी | ४१,७१६.२३ | ३७,१५३.३६ |
| इतर आर्थिक मालमत्ता | २,४२६.९२ | १,०१२.०८ |
| **एकूण आर्थिक मालमत्ता** | **३,६२,५७६.०६** | **२,९२,१९२.७१** |
| **बिगर-आर्थिक मालमत्ता** | | |
| सध्याची कर मालमत्ता (निव्वळ) | ४०४.५७ | २५४.६८ |
| स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | १,०४४.१४ | ९२६.७१ |
| प्रॉपर्टी, प्लान्ट आणि इक्विपमेंट | २,५३१.५१ | २,२१२.४६ |
| भांडवल काम प्रगतीपथावर | २६.७४ | २५.३५ |
| विकासा अंतर्गत अमूर्त मालमत्ता | १२.४६ | १७.२४ |
| अमूर्त मालमत्ता | १,०४३.१४ | ८४७.४७ |
| इतर बिगर-आर्थिक मालमत्ता | २३०.९४ | १३७.८३ |
| **एकूण बिगर-आर्थिक मालमत्ता** | **५,२९३.५०** | **४,४२१.७४** |
| **एकूण मालमत्ता** | **३,६७,८६९.५६** | **२,९६,६१४.४५** |
| **देणी व इक्विटी** | | |
| **देणी** | | |
| **आर्थिक देणी** | | |
| व्युत्पन्न आर्थिक साधने देय | २५.५३ | ०.८५ |
| व्यापार देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | १.२७ | ०.४२ |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | १,११९.८४ | १,०००.९७ |
| ईतर देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | ०.४२ | - |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | ८०६.१९ | ६७०.५६ |
| कर्जाच्या सिक्युरिटीज | १,११,०१०.८८ | ८७,५९६.०९ |
| उधारी (कर्ज रोखे वगळता) | ८९,७३७.६६ | ६९,२३८.०० |
| ठेवी | ७१,३६५.५२ | ५९,९६६.६६ |
| उप-कर्जे | ३,१०३.५४ | ३,५७७.९० |
| इतर आर्थिक देणी | १,६९०.६४ | १,६२१.६१ |
| **एकूण आर्थिक देणी** | **२,७८,८६१.४९** | **२,२३,६७३.०६** |
| **बिगर-आर्थिक देणी** | | |
| सध्याचे कराचे देणे (निव्वळ) | ५४.९७ | ८२.७१ |
| तरतुदी | ४६४.२७ | ३८५.२३ |
| इतर बिगर-आर्थिक देणी | ४९३.१२ | ४६२.९२ |
| **एकूण बिगर-आर्थिक देणी** | **१,०१२.३६** | **९३०.८६** |
| **इक्विटी** | | |
| इक्विटी शेअर भांडवल | १२४.१७ | १२३.६० |
| इतर इक्विटी | ८७,८७१.५४ | ७१,८८६.९३ |
| **एकूण इक्विटी** | **८७,९९५.७१** | **७२,०१०.५३** |
| **एकूण देणी व इक्विटी** | **३,६७,८६९.५६** | **२,९६,६१४.४५** |

**आकस्मिक देणी (स्टँडअलोन)**

| तपशील | ३१ मार्च २०२५ रोजी | ३१ मार्च २०२४ रोजी |
|---|---|---|
| कर्ज म्हणून गणले जात नाहीत असे कंपनीविरुद्धचे विवादाचे दावे | १४१.२० | १२२.१६ |
| अपील अंतर्गत पीएफ बाबी | ११०.७६ | - |
| अपील अंतर्गत वॅट बाबी | ४.३१ | ४.३१ |
| अपील अंतर्गत ईएसआय बाबी | ५.१४ | ५.१४ |
| बँक हमी | ०.५० | २.५० |
| अपील अंतर्गत जीएसटी / सेवा कर बाबी | | |
| - व्याज सबसिडीवर | २,४२२.९२ | २,२९३.६४ |
| - गुंतवणुकीच्या क्रियाकलापावरील क्रेडिटच्या अतिरीक्त प्रवर्तनावर | ६३०.३२ | ६०२.०६ |
| - आगाऊ वसूल केलेल्या व्याजावर | ८७४.७९ | - |
| - दंडव्याज/ चार्जेस यांवर | - | - |
| - ग्राहकाने क्रेडिट नोटवर इनपुट टॅक्स क्रेडिट परत केल्यावर | १४.१३ | १२.९० |
| - जास्तीच्या दाव्यावर आयटीसी आणि जीएसटीआर-१ विरुद्ध जीएसटीआर ३बी मधील फरक | ३३.२९ | २८.५६ |
| - इतरांबाबत | १५.४८ | १४.९० |
| प्राप्तीकराच्या बाबीः | | |
| - कंपनीद्वारे केली गेलेली अपिल्स | ७२.६१ | १.६१ |
| - प्राप्तीकर विभागाने केलेली अपिल्स | - | ०.२८ |

**छ. क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज ॲक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिटस् (रिझर्व बँक) डायरेक्शन्स, २०१६ यानुसार कंपनी डिपॉझिटच्या मार्गाने उभी करू शकणारी रक्कम आहे: १,२३,३५०.७८ कोटी**

**ख) प्रत्यक्षात ३१.०३.२०२५ रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम खालीलप्रमाणे आहे :**

**(I) सार्वजनिक ठेवी (दावा न केलेल्या ठेवींसह): ४१,७९२.२२ कोटी**

**(ii) सार्वजनिक ठेवींव्यतिरिक्त (दावा न केलेल्या ठेवींसह): २९,५७३.३० कोटी**

**ज.** ज्यात संचालक/कंपनी यांना ठोस स्वारस्य अशा त्याच समूहातील कंपन्या किंवा इतर एन्टिटीज किंवा व्यापार-उदीमाचे प्रकल्प यांना दिलेल्या निधी किंवा बिगर-निधी स्वरुपाची एकूण येणी (ड्यूज) ही ६४२.१९ कोटी इतकी आहेत (बजाज हौसिंग फिनान्स लि. - ०.७४ कोटी, बजाज आलियान्झ लाईफ इन्शुरन्स कंपनी लि. - ५३.५६ कोटी, बजाज आलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लि. - १३.८१ कोटी, बजाज फिन्सर्व हेल्थ लि. - ८.१७ कोटी, बजाज ऑटो लि. - १०.२७ कोटी, बजाज इलेक्ट्रीकल्स लि. - ०.६२ कोटी, बजाज फिनान्शियल सेक्युरिटीज लि. - ५२५.१२ कोटी, बजाज फिनसर्व्ह डायरेक्ट लि. - ०.११ कोटी, बजाज होल्डिंग आणि इन्वेस्टमेंट लि. - ०.७० कोटी, बजाज फिनसर्व्ह वेन्चर्स लि. - ६.२२ कोटी, बजाज ऑटो टेक्नॉलॉजी लि. - ०.४७ कोटी, बजाज ऑटो क्रेडिट लि. - ०.४२ कोटी, बजाज प्रोजेक्ट्स लि. - २१.६६ कोटी, पेनंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. - ०.३२ कोटी,).

**झ.** ज्याबाबत दावा केला गेला नाही त्याशिवाय इतर कोणत्याही देण्याची वेळ टळून गेलेल्या (ओव्हरड्यू) ठेवी कंपनीकडे नाहीत.

**ञ.** कंपनी खालीलप्रमाणे घोषित करीत आहेः
I) आपल्याला लागू असलेल्या निर्देशांच्या तरतुदींचे पालन कंपनीने केलेले आहे.
ii) निर्देशांची पूर्तता होण्यामुळे, रिझर्व बँक ऑफ इंडियाने ठेवी परत देण्याची (रिपेमेंट) हमी घेतली आहे असे सूचित होत नाही
iii) कंपनीने स्वीकारलेल्या ठेवी ह्या सुरक्षित नाहीत (अनसिक्युअर्ड आहेत) आणि इतर अनसिक्युअर्ड देण्यांच्याच श्रेणीत त्या गणल्या जातात.
iv) कंपनीने विनंती केली आहे त्या ठेवींचा विमा उतरवलेला नाही.
v) अर्जाच्या प्रपत्रात प्रकट केली आहे ती कंपनीची आर्थिक स्थिती व त्यातील निवेदने ही खरी आणि अचूक आहेत. त्यातील अचूकता आणि सत्यता यासाठी कंपनी आणि तिचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. कंपनीची आर्थिक कृती-कार्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाद्वारे नियंत्रित केली जातात. तथापि, हे स्वच्छपणे समजून घेतलेच पाहिजे की कंपनीच्या आर्थिक भक्कमतेसाठी किंवा कोणत्याही निवेदनांच्या अचूकतेसाठी किंवा कंपनीद्वारे मांडल्या गेलेल्या भूमिका किंवा व्यक्त केलेली मते आणि ठेवी परत देण्याची / देणी चुकवण्याची कंपनीची स्थिती याबाबतची कोणतीही जबाबदारी रिजर्व बँक ऑफ इंडिया घेत नाही.

**ट.** ठेवी ह्या, अर्जाच्या प्रपत्रात दिलेल्या अटी व शर्तींच्याही अधीन राहतील.

**ठ.** रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या त्या संदर्भातील नियमनांच्या अधीन राहून मुदतीच्या अंतिम दिनांकापूर्वी ठेवी काढून घेता येऊ शकतील. कृपया नोंद घ्या की मुदतीआधी ठेव काढून घेणे (मृत्यूच्या केसेसचा समावेश) हे खालील अटींच्या अधीन राहिल
क) ठेवीच्या तारखेपासून ३ (तीन) महिन्यांपर्यंत: ठेव काढण्याची परवानगी नाही. तथापि:
i) ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास, कंपनी हयात असलेल्या ठेवीदाराला मुदतीपूर्वीच ठेवीची परतफेड करू शकते (प्रतीक्षा कालावधीचा विचार न करता) (जो संयुक्त धारकांच्या बाबतीत अर्जातील अर्जदारांच्या अनुक्रमात प्रथम असेल त्याप्रमाणे) किंवा प्रकरणाप्रमाणे मृत ठेवीदाराच्या नामनिर्देशित/कायदेशीर वारसांना, हयात ठेवीदार/नामनिर्देशित/कायदेशीर वारसाच्या विनंतीनुसार करू शकते मात्र त्यासाठी कंपनीची खातरजमा होण्यासाठी मृत्यूचा पुरावा आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
ii) जर ठेवीदाराला, आणीबाणीच्या प्रसंगीचा वैद्यकीय खर्च किंवा नैसर्गिक आपत्तींमुळे किंवा संकटांमुळे करावा लागणारा खर्च यांसारख्या तातडीच्या खर्चासाठी त्याची ठेव मुदतपूर्तीपूर्वी काढायची असेल, तर अशी ठेव काही अंशी म्हणजे मुद्दल रकमेच्या ५०% पर्यंत किंवा ५ लाख रुपये यांपैकी जी कमी असेल तेवढी रक्कम मुदतपूर्तीपूर्वी काढण्याची परवानगी आहे. बीएफएलच्या धोरणानुसार अशा प्रकारच्या तातडीच्या खर्चांची पडताळणी/मुल्यांकन केले जेऊ शकते.
iii) अत्यंत गंभीर अवस्थेतील आजारासाठी ठेवीदाराला मुद्दल रकमेच्या १००% पर्यंत रक्कम व्याजाशिवाय देण्यात येईल. या पोटकलमासाठी 'गंभीर आजार' या शब्दाची व्याख्या ही वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आयआरडीएआय (हेल्थ इन्शुरन्स) रूल्स, २०१६ मध्ये दिल्यानुसार व त्याअंतर्गत जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार असेल.
iv) ठेवीदाराने विनंती केल्यास एकूण १०,००० रुपयांपेक्षा जास्त मुद्दल रक्कम नसलेल्या ठेवी (''टायनी डिपॉझिट'') ठेवीदाराला किंवा सर्व ठवींच्या बाबतीत त्याच भूमिकेत प्रथम नाव असलेल्या ठेवीदाराला मुदतपूर्तीपूर्वी व्याजाशिवाय प्रदान केल्या जातील.
ख) ठेवीच्या तारखेपासून ३ (तीन) महिन्यानंतर परंतु ६ (सहा) महिन्यांपूर्वी. ठेव काढण्याची परवानगी दिली जाईल. तथापि, व्याज देय असणार नाही.
ग) ६ (सहा) महिन्यांनंतर परंतु ठेवीच्या परिपक्वता तारखेपूर्वी: ठेव काढण्याची परवानगी दिली जाईल. ज्या कालावधीसाठी ठेव योजना चालू केली आहे त्या कालावधीसाठी निर्दिष्ट केलेल्या दरापेक्षा २% कमी दराने व्याज देय असेल. जर ठेव कालावधीसाठी कोणताही दर निर्दिष्ट केलेला नसल्यास, देय व्याजदर हा कंपनीने देऊ केलेल्या सर्वात कमी दरापेक्षा ३% कमी असेल.

**ड.** असल्यास, शाखांच्या किंवा एककांच्या तपशीलासह कंपनी व तिच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः
१. कंपनी व तिच्या शाखा चालवत असलेला व्यापार-उदीमः
ग्राहकांना अर्थ-पुरवठा करण्याच्या श्रेणीमध्ये यांचा समावेश - वाहन-कर्ज, दीर्घ काल वापरण्याच्या वस्तूंसाठी ग्राहकांना कर्ज, वैयक्तिक कर, मालमत्ता तारण कर्ज, गृह कर्ज, बांधकाम साहित्य खरेदीसाठी कर्ज, लहान व्यवसायासाठी कर्ज, सिक्युरीटीजच्या तारणावर कर्ज आणि पायाभूत सोयी-सवलतींसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) कर्ज. कंपनीच्या शाखा येथे आहेत: आग्रा, अहमदाबाद, अहमदनगर, अजमेर, अकोला, अकोट, अलापुझ्झा, अलाहाबाद, अंबाला, अमरावती, अमरेली, अमृतसर, आणंद, अनंतपूर, आणि अंकलेश्वर, असनसोल, औरंगाबाद, बागलकोट, बंगलोर, बारामती, बार्डोली, बरेली, बडोदा, बार्शी, बेळगाव, बेल्लारी, भंडारा, भडोच, भटिंडा, भावनगर, भिलाई, भिवंडी, भोपाल, भुवनेश्वर, भूज, बिदर, विजापूर, बिकानेर, बिलासपूर, बोकारो, बोलपूर, बोरसाड, कालिकत, चाळीसगाव, चंदिगड, चंद्रपूर, चेन्नई, छिंदवाडा, चिखली, चिपळूण, चित्रदुर्ग, चित्तरंजन, चोपडा, कोचीन, कोईम्बतूर, कडलोर, कटक, दाभोई, दाहोद, दावणगेरे, डेहराडून, देवास, धनबाद, धारापुरम, धारवाड, धुळे, दिंडीगुल, दुर्गापूर, एलुरू, इरोड, गांधीधाम, गोवा, गोकाक, गुलबर्गा, गुना, गुंटूर, ग्वाल्हेर, हलदिया, हलोल, हासन, हावेरी, हिंम्मतनगर होशंगाबाद, होशियारपूर, हॉस्पेट, हुबळी, हैदराबाद, इंदूर, जबलपूर, जगधरी, जयपूर, जालंधर, जळगाव, जलपैगुडी, जम्मू, जामनगर, जामनेर, जमशेदपूर, जोदपूर, जुनागढ, कडी, कैथाल, काकीनाडा, कालका, कन्नूर, कानपूर, कपूरथळा, क-हाड, कराईकुडी, कर्नाल, करुनागापल्ली, करूर, कारवार, कटनी, खामगाव, खांडवा, खडगपूर, कोलार, कोल्हापूर, कोलकाता, कोल्लम, कोपरगाव, कोरबा, कोटा, कोट्टायम, कर्नूल, कुरुक्षेत्र, लातूर, लखनौ, लुधियाना, मच्छलीपट्टम, मदुराई, मंड्या, मंगलोर, म्हापसा, मडगाव, मेहसाणा, मोगा, मोर्वी, मुंबई, म्हैसूर, नभा, नडियाद, नागरकॉईल, नागपूर, नमक्कल, नांदेड, नंदुरबार, नाशिक, नवसारी, नेल्लोर, नवी दिल्ली, पालनपूर, पंढरपूर, पानिपत, पतियाळा, पाटणा, पेण, फगवाडा, पिंपळगाव, पोलाची, पॉंडिचेरी, पुणे, पुत्तूर, रायचूर, रायपूर, राजामुंद्री, राजगुरूनगर, राजकोट, राजनांदगाव, राजपुरा, राणाघाट, रांची, रतलाम, रत्नागिरी, रेवा, रोहतक, रोपार, राऊरकेला, सालेम, सांगली, सातारा, सतना, सिहोर, सिमला, शिमोगा, सिलीगुडी, सिरसा, सोलापूर, सुरत, सुरेंद्रनगर, तेनाली, थिरुवल्ला, थिरुनेलवेल्ली, तिरुपती, थिरूपूर, त्रिचूर, त्रिची, त्रिवेंद्रम, तुमाकुरू, तुतीकोरीन, उदयपर, उडिपी, उज्जैन, वडाकारा, बलसाड, वापी, वाराणसी, विदिशा, विजयवाडा, विझाग, विजयानगरम, वणी, वारंगल, वर्धा, वरूड, वाशिम, यवतमाळ आणि www.bajajfinserv.in=> Contact us=>Visit our branch या अधिकृत संकेतस्थळ पानावर नमूद केलेल्या इतर सर्व शाखा किंवा https://www.bajajfinserv.in/branch-locator यावर थेट क्लिक करा.
२. किमान ठेव रक्कम रु.५०००/- असलेल्या जागा: (ऑनलाईन गुंतवणुकीस पात्र नाही)
अ) गुजरात - बुजेठा, काहांवा, खापरवाडा, नांदरखा, सुनेवकाला, अमाडपोर, असर्मा, दारापुरा, डुंगरी, गोदावडी, हरंगम, कोटंबी, सार्वाणी, वंस्कूई, बालडा, भाटी करंबेली, जीताली, उमरा, बर्कल, भटलाई, कण्यासी, पार्डी झंखारी, पाथरी, करमळ, हांडोद चोकडी, भडकड, देहमी, दाभासी, कंथारीया, विरोल, लिलछा, नवगम इसारी, सांगल, वानियाद, महुडी, परसा गंज, वसना राठोड, मेनपुरा, सिहुंज, वसना, वसई, दधियाल, कुडा गंज, वडवी, वरवडा.
ब) महाराष्ट्र - बारागाव पिंपरी, खर्डे, मांजरोड, जातोडा, मेहेरगाव, सोमठाणे, ओढा, वार, शहा, भातने जवखेडा, लामकानी, चिंचखेडे, शेवडे, गोंदूर, दोडी बुद्रुक, रायपूर, भाटपुरे, वरुड (महाराष्ट्र), दीघवे, वडजाई, इंदवे, विंचूर, देवभाने, देऊर बुद्रुक, पांढुर्ली.
क) राजस्थान - अकोला आरजे, बदर्डा, बघेरा, भिनय, बोरज, दाबोक आरजे, दौलतपुरा, दौराई, डुंगला, गनाहेरा, गोविंदगड, हुरडा, जाहोटा, जैतपुरा, जालिया २, जट्वारा, जेठाना, काडेरा, करोई कलान, कोट खवाडा, कोठिया, लालचंदपुर, मानपुरा मंचेरी, मेनार, मुहाना, नाई की थाडी, नटाटा, निवाना, राडावस, साराधाना.
३. कंपनीच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः

| अ. क्र. | उपकंपनीचे नाव | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | कृती-कार्य |
|---|---|---|---|
| 1. | बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | हाउसिंग फायनान्स व्यापार-उदीम |
| 2. | बजाज फायनान्शियल सिक्युरिटीज लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | स्टॉक ब्रोकिंग आणि डिपॉझिटरी सहभागी |

**जाहिरातीचा वरील मजकूर हा संचालक मंडळाच्या अधिकाराने व त्यांच्या नावाने जारी केला गेलेला आहे आणि संचालक मंडळाने २३ जुलै २०२४ च्या आपल्या बैठकीत या मजकुराला मान्यता दिलेली आहे आणि मंडळाने अधिकार दिलेले श्री. अनुप साहा, व्यवस्थापकीय संचालक यांनी सही केलेली त्याची एक प्रत नोंदणीसाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे पोहचवली गेलेली आहे.**

बजाज फायनान्स लिमिटेडसाठी
संचालक मंडळाच्या आदेशान्वये

पुणे
१२ मे २०२५

श्री. अनुप साहा
व्यवस्थापकीय संचालक
DIN: ०७६४०२२०

**गुंतवणूक कशी करावी:**

गुंतवणूक केवळ धनादेश द्वारे, नेटबँकिंग द्वारे होऊ शकते. धनादेश द्वारे गुंतवणूक करत असल्यास Bajaj Finance Ltd. A/c 00070350006738 ह्या नावाने करावी. त्यावर 'अकाऊंट पेयी ओन्ली' असे लिहून तो क्रॉस करावा. धनादेश 'at par' देय असावा व CTS पूर्ततेचा असावा. गुंतवणूक रकमेसह अर्ज प्रपत्र ह बजाज फिनान्स च्या मुदत ठेव वितरकांकडे किंवा बजाज फिनान्स च्या कोणत्याही शाखांकडे द्यावे. नेटबँकिंग द्वारे गुंतवणूक करायची असल्यास ह्या तपशीलाचा वापर करावा: लाभार्थी नावः बजाज फिनान्स लि. मुदत ठेव संकलन खाते, बँक खाते क्र.: BFLFD8 (संख्यात्मक खाते क्र. ECMS संकलन कोड BFLFD8 ने बदलला आहे), बँक खाते प्रकार: करंट खाते, बँकेचे नाव: एचडीएफसी बँक लि., आयएफएससी: HDFC0004989, बँक शाखा: कांजुरमार्ग, मुंबई. **अधिक माहितीसाठी किंवा आमच्या वितरकांसंबंधी माहितीसाठी wecare@bajajfinserv.in वर ई-मेल करा किंवा +९१ ८६९८०१०१०१ वर फोन करा.**

